# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ०५ एप्रिल, २०१७ / चैत्र १५, १९३९ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **गृहनिर्माण मंत्री** | |
| **(३)** | **कामगार, कौशल्य विकास, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३७**

---

### मुंबईतील उद्याने व मनोरंजन मैदाने महानगरपालिकेकडून जुन्याच संस्थांना ताब्यात दिल्याबाबत

**(१) * २७७०३ श्री.नारायण राणे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेकडून ताब्यात घेण्यात आलेली उद्याने व मनोरंजन मैदाने मर्जीतील जुन्याच संस्थांना दत्तक देण्याच्या धोरणाला महानगरपालिकेच्या सुधार समितीने मान्यता दिली असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धोरणामुळे सदर मैदाने व उद्याने ज्या संस्थांना देण्यात येणार आहेत त्या संस्थाची तिथे मक्तेदारी निर्माण होवून सामान्य नागरिकांना तेथे मज्जाव होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.मुख्यमंत्री यांचे आदेशात बदल करुन मुंबईतील उद्याने पुन्हा जुन्याच संस्थांना देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, खाजगी संस्थांची मनमानी रोखण्यासाठी शासन उक्त प्रकरणी धोरणात्मक निर्णय घेऊन महानगरपालिकेकडून मैदानाची देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) महानगरपालिकेने ताब्यात घेतलेली उद्याने व मनोरंजन मैदाने कोणत्याही संस्थेस देण्यात आलेली नसून, त्यांचे परिरक्षण सद्य:स्थितीत महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

तथापि, उद्याने व मनोरंजन मैदाने यांच्या परिरक्षणासाठीचे तात्पुरते धोरण प्रस्तावित असून, त्यास महानगरपालिकेच्या सुधार समितीने डिसेंबर, २०१६ मध्ये मान्यता दिली आहे. परंतु या तात्पुरत्या धोरणास महानगरपालिकेची अद्यापि मान्यता मिळालेली नाही.

**<u>प्रस्तावित तात्पुरते परिरक्षण धोरण:-</u>**

- सदर कालावधी दत्तक तत्वावर मानण्यात येणार नाही.
- सदर व्यवस्था ११ महिने किंवा दत्तक धोरणाला मान्यता मिळेपर्यंत जे अगोदर असेल तेवढ्या कालावधीसाठी राहील.
- त्याअंतर्गत भूखंड ११ महिन्यांसाठी केवळ परिरक्षणाकरीता संस्थांच्या ताब्यात देण्यात येतील.
- परिरक्षणासाठी देण्यात येणाऱ्या भूभागांवर सर्वसामान्य नागरीकांना प्रवेश व सर्व सोयी-सुविधा नि:शुल्क देणे बंधनकारक असेल.

उद्याने व मनोरंजन मैदाने दत्तक तत्वावर देण्याचे धोरण महानगरपालिकेमार्फत सर्वकष विचार करुन पुनर्विलोकित करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नांदेड शहरातील भाग्यनगर परिसरात नियमित घरफोड्या होत असल्याबाबत**

**(२) * ३०६९८ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरातील भाग्यनगर परिसरात पुन्हा एकदा घरफोडी झाल्याचा प्रकार निदर्शनास आला असून घरफोडया व इतर प्रकरणात पोलिसांची निष्क्रियता असल्याने नागरिकांतून संतापाची लाट निर्माण झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) माहे जानेवारी, २०१७ मध्ये पोलीस स्टेशन भाग्यनगर येथे घरफोडी या सदराखाली खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

१) पोलीस स्टेशन भाग्यनगर, नांदेड येथे गु.र.नं. ०५/२०१७ भा.दं.वि. कलम ४५७, ३८०.
२) पोलीस स्टेशन भाग्यनगर, नांदेड येथे गु.र.नं. ०६/२०१७ भा.दं.वि. कलम ४५७, ३८०.
३) पोलीस स्टेशन भाग्यनगर, नांदेड येथे गु.र.नं. ३०/२०१७ भा.दं.वि. कलम ४५७, ३८०.
४) पोलीस स्टेशन भाग्यनगर, नांदेड येथे गु.र.नं. ३४/२०१७ भा.दं.वि. कलम ४५४, ४५७, ३८०.
५) पोलीस स्टेशन भाग्यनगर, नांदेड येथे गु.र.नं. ३६/२०१७ भा.दं.वि. कलम ४५४, ४५७, ३८०.

वरील गुन्ह्यातील आरोपी अज्ञात असल्याने सदर आरोपी निष्पन्न करणे व गेला माल हस्तगत करण्यावर सदरचे गुन्हे पोलीस तपासावर आहेत.

(२) पोलीस स्टेशन भाग्यनगर हद्दीत मालमत्ता संबंधी गुन्ह्यास प्रतिबंध करण्यासाठी पोलीस स्टेशन हद्दीत दररोज रात्रगस्त नेमण्यात येत आहे. तसेच पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत रात्री मोबाईल पेट्रोलिंग ठेवण्यात येत आहे. पोलीस स्टेशन हद्दीत बिट मार्शल नेमून त्यांच्याद्वारे २४ तास पेट्रोलिंग करण्यात येत आहे. पोलीस स्टेशन हद्दीतील अभिलेखावरील सक्रीय गुन्हेगारांना वेळोवेळी चेक करुन त्यांचेविरुध्द परिणामकारक प्रतिबंध कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) विलंब झालेला नाही.

-----------------

**लालबाग (मुंबई) येथील उड्डाणपुलास तडे गेल्याबाबत**

**(३) * ३००१३ ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लालबाग (मुंबई) येथे ५ वर्षापूर्वी एम.एम.आर.डी.ए. ने बांधलेल्या पुलाला पुन्हा एकदा मोठया प्रमाणात तडे गेल्याने गर्दीच्या वेळी वाहतुक कोंडी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार ज्या कंत्राटदार कंपनीने हा पूल बांधला त्यांचेवर कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) लालबाग (मुंबई) येथील उड्डाणपुलास 'एक्सपान्शन जॉइन्ट्' (Expansion Joints) च्या लोखंडी पट्टया व रबर सील निखळलेले आढळून आले होते.

सदर ठिकाणी तातडीने 'एक्सपान्शन जॉइन्ट्' (Expansion Joints) व रबर सील बसविण्यात आले असून, उड्डाणपुलावरील वाहतुक सुरळीत सुरु आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर प्रकरणी चौकशी करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मालेगांव (जि.नाशिक) येथे पोलीस आयुक्तालय स्थापन करणेबाबत**

**(४) * २८३८२ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १९७२१ ला दिनांक २० जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) शहराची कायदा व सुव्यवस्थेच्यादृष्टीने असलेली संवेदनशिलता तसेच मालेगांव महानगरपालिकेची एकुण लोकसंख्या व मालेगांव महानगरपालिका स्थापन होऊन बराच कालावधी झालेला आहे, इत्यादी बाबी विचारात घेता याठिकाणी पोलीस आयुक्तालय स्थापन करणेबाबतची मागणी सर्वच स्तरावरून सातत्याने करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत पावसाळी अधिवेशन, २०१६ मध्ये मालेगांव (जि.नाशिक) येथे नवीन पोलीस आयुक्तालय स्थापन करणेबाबतचा फेरप्रस्ताव पोलीस महासंचालक यांचेकडून प्राप्त झालेला नाही असे तारांकित प्रश्न क्रमांक १९७२१ च्या लेखी उत्तरात नमूद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याप्रमाणे पोलीस आयुक्तालयाचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे काय, तद्नुसार याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, यासंबंधिचा फेरप्रस्ताव प्राप्त झालेला नसल्यास यासाठी होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत व उक्त फेरप्रस्ताव तात्काळ मागवून त्यास सत्वर मंजुरी देणेबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) मालेगांव (जि.नाशिक) हे शहर कायदा व सुव्यवस्थेच्यादृष्टीने संवेदनशिल असल्यामुळे व तेथील आजुबाजुच्या परिसरात व लोकसंख्येत वाढ झाल्याने मालेगांव (जि.नाशिक) येथे अस्तित्वात असलेल्या पोलीस ठाण्याच्या संख्येत, प्रभाग, जागा, लोकसंख्या यांच्या प्रमाणात नवीन पोलीस ठाणे निर्मिती प्रस्तावित करुन त्यासह स्वतंत्र पोलीस आयुक्तालय स्थापन करण्याबाबतचा सुधारीत परिपुर्ण प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही पोलीस अधिक्षक, नाशिक (ग्रामीण) व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यास्तरावरुन करण्यात येत आहे. सदरहू प्रस्ताव शासनास अप्राप्त आहे.

-----------------

## मुंबईत मेट्रो प्रकल्पामुळे वाहतूक कोंडी होत असल्याबाबत

**(५) * ३००६४ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत शासनाने हाती घेतलेल्या मेट्रो प्रकल्पाच्या कामामुळे पश्चिम उपनगरात विविध ठिकाणी मोठया प्रमाणात वाहतूक कोंडीमुळे नागरिक त्रस्त झाले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने वाहतूक कोंडी सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पश्चिम द्रुतगती महामार्गावर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मेट्रो मार्ग-७ व २-अ ची कामे माहे जून, २०१६ मध्ये हाती घेतलेली आहेत. बांधकाम करणेसाठी आवश्यक तेथे वाहतूक पोलिसांशी समन्वय साधून ऑक्टोबर, २०१६ मध्ये बॅरिकेडिंग करण्यात आले आहे.

(२) व (३) पश्चिम द्रुतगती महामार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून वाहतूक पोलिसांनी टप्याटप्प्यात बॅरिकेडिंग केले आहे. तसेच शक्य तेथे अतिरिक्त लेन निर्माण केली आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने वाहतूक पोलिसांच्या मदतीने आवश्यक तेथे वाहतूक सहाय्यक नेमण्यात आले आहेत. तसेच वाहतूक पोलिसांना दुचाकी वाहने पुरविण्यात आली असून आवश्यक तेथे तात्काळ पोहचण्यास वाहतूक पोलिसांना मदत होत आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने वाहतूक पोलिसांच्या विनंतीनुसार वाहतूक विभागास बॅरिकेटस, कोन देण्यात आले असून त्याच्या सहाय्याने रिर्व्हसेबल लेन रोज अतिरिक्त पुरविण्यात येत आहे. वाहतूक विभागातर्फे सीसीटीव्हीच्या सहाय्याने बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.

-----------------

## वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात झाडांच्या संरक्षणार्थ लोखंडी जाळ्या (ट्री-गार्ड) लावण्याच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(६) * २८१५६ श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात रस्त्याच्या दुतर्फा लावण्यात आलेल्या झाडांच्या संरक्षणार्थ लोखंडी जाळया (ट्री-गार्ड) लावण्याच्या कामात सुमारे ७ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामाचे कंत्राट मे.हिरावती एंटरप्रायजेस या कंपनीस देण्यात आला होते व पन्नास हजार लोखंडी ट्री-गार्ड बसविण्याचे उद्दिष्ट आखून देण्यात आले असताना वसई-विरार क्षेत्रात एकूण ४९,६०० लोखंडी ट्री-गार्ड बसविण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुमारे ७७ टक्के लोखंडी ट्री-गार्ड लावलेच नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार यास जबाबदार असणा-या दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय. अशा स्वरुपाची तक्रार स्थानिक नगरसेवक यांनी दिनांक ०५/०१/२०१७ रोजी केली आहे.
(२), (३) व (४) ई-निविदेमार्फत निवड झालेल्या ठेकेदारांनी ५०,००० लोखंडी जाळ्यापैकी (ट्री गार्ड) आवश्यकतेनुसार एकूण ४९,६०० इतक्या लोखंडी जाळ्या (ट्री गार्ड) बसवले होते. त्यापैकी सद्य:स्थितीत १५,००० इतक्या लोखंडी जाळ्या (ट्री गार्ड) जागेवर आहेत.

उर्वरीत ३४,६०० लोखंडी जाळ्या दोन वर्षाच्या कालावधीत चोरीला गेल्याने पोलीस स्थानकात त्यानुसार वेळोवेळी तक्रार नोंदविण्यात आलेल्या आहेत असे आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

याबाबत आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना सखोल चौकशी करुन चार आठवड्यात अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

**राज्यातील होमगार्ड जवानांच्या मागण्या पूर्ण करणेबाबत**

**(७) * ३०७६५ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील होमगार्ड जवानांना ३६५ दिवस कायम सेवा (डयूटी) देण्यात यावी या सह विविध मागण्या पूर्ण करण्याची मागणी होमगार्ड जवानांनी शासनाकडे वेळोवेळी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील होमगार्ड जवानांच्या कोणकोणत्या मागण्या शासनाकडे सादर करण्यात आल्या आहेत,
(३) असल्यास, होमगार्ड जवानांना कायम ३६५ दिवस सेवा देणेबाबत शासन विचाराधीन आहे काय,
(४) असल्यास, उक्त मागण्यांबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) ३६५ दिवस कायम डयुटी मिळणे, होमगार्डना पोलीस कर्मचाऱ्यांप्रमाणे सोयी सुविधा मिळणे, होमगार्डना नियमित करणे, १२ वर्षे सेवा कालावधी अट रद्द करणे, सानुग्रह अनुदान मिळणे, पुनर्नोंदणी अट रद्द करणे इत्यादी मागण्या सादर केलेल्या आहेत.

(३), (४) व (५) होमगार्ड ही मानसेवी संघटना आहे. पोलीस दलास सहाय्य करण्यासाठी प्रामुख्याने होमगार्ड उपलब्ध करुन दिले जातात. समाजसेवेच्या हेतून होमगार्ड मध्ये स्वयंसेवकांची नोंदणी केली जाते. त्यामुळे नियमित शासकीय सेवकाप्रमाणे होमगार्डना लाभ मान्य करणे शक्य नाही. तसेच होमगार्डना ३६५ दिवस नियमित सेवा उपलब्ध करुन देणे शक्य नाही. होमगार्ड विकास समिती यांनी त्यांच्या मागण्याबाबत महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर येथे अर्ज दाखल केला आहे.

-----------------

## भाईंदर (पूर्व) येथील चार वर्षीय मुलीवर अत्याचार केल्याबाबत

**(८) * २९५३८ श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाईंदर (पूर्व), (जि.पालघर) येथील आझाद नगर मधील अपहरण केलेल्या चार वर्षीय मुलीवर अत्याचार करुन मृतदेह नाल्यात फेकून दिल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार अपहरण करुन बालिकेवर अत्याचार करणाऱ्या नराधमावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सदर घटना पालघर जिल्हयातील नसून ठाणे जिल्हयातील घटना आहे,

(२) आझादनगर, भाईंदर (पूर्व) हा परिसर ठाणे जिल्हयातील नवघर पोलीस ठाणे अंतर्गत येतो. दिनांक ९/१/२०१७ रोजी २०.०० वा.सुमारास घडलेल्या सदर प्रकरणाची फिर्यादीने दिनांक १०/१/२०१७ रोजी फिर्याद दिल्याने नवघर पोलीस ठाणे I ०७/२०१७ भादंवि कलम ३६३, ३६४, ३७६-ड (२)(आय), ३०२, २०१, ३४ सह

लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ४, ६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयातील ३ आरोपींना अटक केली आहे. उर्वरित एक आरोपीचा शोध सुरु आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई महानगरपालिकेच्या भगवती रुग्णालयात वैद्‌यकीय सोयी-सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(९) * २९२०७ श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पश्चिम उपनगरात असलेल्या महानगरपालिकेच्या भगवती रुग्णालयात ६ महिन्यांत केवळ ६५४ रुग्णांवर उपचार करण्यात आले असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रुग्णालयात रुग्णांवर उपचारासाठी कोणत्याही प्रकारची सोय उपलब्ध नसल्याने गरीब रुग्णही या रुग्णालयाकडे पाठ फिरवून अन्य खाजगी रुग्णालयाचा आधार घेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त रुग्णालयात रुग्णांसाठी आवश्यक वैद्‌यकीय सोयी-सुविधा व कर्मचारी पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) अशा प्रकारची बातमी महाराष्ट्र टाईम्स वृत्तपत्रात दिनांक २९/१२/२०१६ रोजी प्रसिध्द झाली होती, हे खरे आहे.

भगवती रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण व आंतररुग्ण विभागात डिसेंबर, २०१६ अखेरपर्यंत २४,९१२ रुग्णांवर उपचार करण्यात आले आहेत.

भगवती रुग्णालयाच्या पुनर्विकासाच्या पहिल्या टप्प्यात बांधण्यात आलेल्या नर्सेस ट्रेनिंग कॉलेजच्या (एनटीसी) इमारतीत बाह्यरुग्ण विभाग दिनांक १५/०४/२०१६ पासून व आंतररुग्ण विभाग दिनांक २७/०६/२०१६ पासून सुरु करण्यात आले असून, प्रयोगशाळा, क्ष-किरण, इ.सी.जी. इत्यादी सोयी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

भगवती रुग्णालयाच्या आस्थापनेवर वैद्यकीय, परावैद्यकीय (पॅरामेडिकल) संर्वगाची १८१ पदे व कामगार संवर्गाची १०६ अशी एकूण २८७ पदे निर्माण करण्यात आली आहेत. त्यापैकी वैद्यकीय, परावैद्यकीय संवर्गाची ९४ व कामगार संवर्गाची ७६ अशी एकूण १७० पदे भरण्यात आलेली असून, उर्वरित पदे भरण्याची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

दुसऱ्या टप्प्यात ८५२ रुग्णशय्येचे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल प्रस्तावित असून, या हॉस्पिटलचा पुनर्विकास व पुनर्बांधणीकरीता निविदा प्रक्रियेची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु असून, तद्नुषंगाने पुढील कार्यवाही लवकरात लवकर पुर्ण करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये सदनिकांच्या देखभाल व दुरुस्ती शुल्कामध्ये वाढ करण्याबाबत**

**(१०) * २७१७१ ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक २३६४८ ला दिनांक ७ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मुंबई व ठाणे शहरात महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळामार्फत झोपडपट्टी पुनर्वसन योजना (SRA) राबविण्यात येत आहे, सदर योजनेंतर्गत सन १९९५ पासून पात्र लाभधारकांना त्यांचे घराचे देखभालीसाठी (Maintainace) रक्कम रुपये २० हजार रुपयांऐवजी ४० हजार करण्याचा निर्णय शासनाने सन २०१६ च्या प्रथम अधिवेशनात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या २० वर्षात वाढलेली महागाई, तसेच पाणी पट्टी, कर, वीज कर व मालमत्ता कर इत्यादी मध्ये वेळोवेळी झालेली वाढ तसेच १५ ते २० वा त्यापेक्षाही अधिक मजल्यांचे इमारती बांधकामास देण्यात येणारी परवानगी, यामुळे पात्र लाभधारकांना देण्यात येणाऱ्या रुपये ४० हजार रकमेत वाढ करुन त्याऐवजी ही रक्कम रुपये ७० हजार इतकी करण्यात यावी, अशी मागणी संबंधित सर्व पात्र धारकांकडून सन २००० पासून ते आजतागायत मुख्याधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग व मा.गृहनिर्माण मंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे वारंवार करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनस्तरावर कार्यवाही केली नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रस्तूत प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) बृहन्मुंबई तसेच ठाणे महानगरपालिका क्षेत्रात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई या कार्यालयामार्फत झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यात येत आहेत.

नगर विकास विभागाच्या दिनांक २१ एप्रिल, २०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ विनियम ३३ (१०) परिशिष्ट-४ च्या खंड ९.१ मधील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पुनर्वसन घटकातील प्रत्येक सदनिकेच्या अनुषंगाने देखभाल खर्चाची रक्कम रुपये २०,०००/- ऐवजी रुपये ४०,०००/- इतकी करण्यात आली आहे.

(२) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये सदनिकांच्या देखभाल व दुरुस्ती शुल्कामध्ये वाढ करण्याबाबत निवेदने संबंधितांकडून प्राप्त झालेली आहेत. तथापि, वर नमूद केल्याप्रमाणे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या प्रस्तावानुसार दिनांक २१ एप्रिल, २०१६ रोजी देखभाल शुल्क वाढविण्याबाबत अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्यामुळे सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने पुन:श्च कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) निवेदनाच्या अनुषंगाने वरील वस्तुस्थिती संबंधितास अवगत करण्यात आलेली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वसई-विरार महानगरपालिकेत नोकरी देण्याचे आमिष दाखवून बेरोजगारांची फसवणूक केल्याबाबत**

**(११) * ३०२८२ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिकेचे बनावट व खोटे दस्तऐवज तयार करून वसई-विरार महानगरपालिकेत नोकरी देण्याचे आमिष दाखवून सुमारे २० बेरोजगारांची लाखो रुपयांची फसवणूक करण्यात आल्याची बाब एका नगरसेवकाने आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका यांच्या निदर्शनास आणून देऊन विरार पोलीस ठाण्यात फौजदारी कारवाई करण्याची मागणी केली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कारवाई करून घेतलेली रक्कम परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदरहू घटनेप्रकरणी महानगरपालिका लेटरहेड वर कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीचा नोकरी देण्याबाबतचा नियुक्ती आदेश महानगरपालिकेकडून निर्गमित केला असल्याचे भासवून त्याद्वारे बेरोजगारांची फसवणूक केल्याबाबतचा तक्रार अर्ज वसई-विरार शहर महानगरपालिकेकडुन दिनांक १०/०३/२०१७ रोजी विरार पोलीस स्टेशनला प्राप्त झालेला आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिकेचे बनावट आणि खोटे दस्तऐवज तयार करुन त्याद्वारे गरजू-बेरोजगार लोकांकडून मोठया प्रमाणात पैसे उकळल्याप्रकरणी विरार पोलीस स्टेशनमार्फत अर्जातील अर्जदार व गैरअर्जदार यांची सखोल चौकशी करुन दोषींविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात येत आहे.

प्रस्तुतचे प्रकरण तपासाधीन आहे.

-----------------

## मुंबई शहर व उपनगरातील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेबाबत

**(१२) * ३०२७६ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरात गेल्या २० वर्षात १ हजार ४०४ योजनांना शासनाने मंजूरी दिलेली असतानाही आजमितीस केवळ १२० झोपू योजना पूर्ण झाल्या असून, उर्वरित १ हजार २८४ योजनांतून ३ लाख ९ हजार २६१ सदनिका प्रस्तावित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मुख्यमंत्र्यांनी झोपु प्राधिकरणाची सुमारे १२ वर्षे न झालेली बैठक घेऊन सदरहू बैठकीत प्रलंबित असलेल्या झोपु योजनांचा आढावा घेऊन काही निर्णय उक्त बैठकीत घेण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू बैठकीत मा.मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या सूचनेनंतर आतापर्यंत झोपु प्राधिकरणाने केवळ २०० हून अधिक झोपु योजनांना नोटीसा बजावल्या असल्या तरीही आजमितीस एकही योजना ताब्यात घेतलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, झोपु योजनांच्या आतापर्यंत रखडलेल्या १ हजार २८४ झोपु योजनेची कामे शिघ्रगतीने हाती घेऊन पूर्ण होण्याच्यादृष्टीने व या योजनेतून उपलब्ध होणाऱ्या ३ लाख ९ हजार २६१ सदनिका उपलब्ध होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली १९९१ च्या विनियम ३३(१०), विनियम ३३(१०) परिशिष्ट-४ मधील उपनियम ३.११ व विनियम ३३(१४) अंतर्गत आतापर्यंत एकूण १४९२ योजनांना मंजूरी देण्यात आली असून अद्यापपर्यंत १,७१,३५८ सदनिकांना भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे व २,३९,३२८ पुनर्वसन सदनिकांचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची दिनांक १/१२/२०१४ व दिनांक १२/८/२०१५ रोजी अनुक्रमे १३ व १४ वी बैठक संपन्न झाली. सदर बैठकांमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनांना गती देण्याच्या अनुषंगाने काही ठराव पारित करण्यात आले.

(३) झोपडपट्टी पुनर्वसन योजनांमध्ये विकासकाविरुध्द अधिनियमाच्या १३(२) अंतर्गत, योजनेच्या बांधकामातील अनियमितता, परवानग्यांतील अटींचा भंग करणे, झोपडीधारकांचे भाडे थकविणे, योजनेतील सहकारी संस्थांची तक्रार इत्यादी कारणास्तव कारवाई केली जाते, ज्यामध्ये विकासक बदलण्याच्या कारवाईचा देखील समावेश असतो. अशा कारवाईबाबत अलिकडेच मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांनी सुमारे १२४ विकासकांना नोटीसा बजाविल्या आहेत.

(४) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या १३ व्या व १४ व्या बैठकीमध्ये घेतलेल्या निर्णयानुसार मुंबई शहरातील सर्व झोपडपट्टी क्षेत्राचे जीआयएस तंत्रज्ञानाच्या आधारे पूर्ण सर्वेक्षण करण्यात येत आहे. प्रलंबित योजनांमधील विकासकांना कारणे दाखवा नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. खाजगी जमिनीवरील झोपडपट्टयांचे संदर्भात संबंधित जमीन मालकांना नोटीस देऊन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. परिशिष्ट-२ त्वरेने प्रमाणित होण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यांची संख्या वाढविण्यात आली आहे. विकास नियंत्रण नियमावलीत काही सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## घाटकोपर मधील छेडानगर येथे अंमली पदार्थाचा पुरवठा करणा-यावर कारवाई करण्याबाबत

**(१३) * २९३१९ श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील घाटकोपर येथील छेडानगर जंक्शन येथून अंमली पदार्थाचा पुरवठा करणा-यास अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या घाटकोपर युनिटने अटक केली असल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी श्री.प्रवीण वाघेला या व्यक्तीला अटक करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) अंमली पदार्थ विरोधी कक्षाच्या घाटकोपर युनिटने दिनांक ९/१/२०१७ रोजी गु.र.क्र. ०२/२०१७ कलम ८ (क) सह २२ (क), २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट, १९८५ अन्वये गुन्हा नोंद केला असून, यात प्रविण वाघेला यासह अन्य दोन आरोपींना अटक करण्यात आली असून, आरोपी अद्याप पर्यंत न्यायालयीन कोठडीत बंद आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## न्हावा-शेवा बंदरातून रक्तचंदनाची तस्करी होत असल्याबाबत

**(१४) * ३०१२६ श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) न्हावा-शेवा बंदरावर महसूल गुप्तवार्ता संचालनालयाने टाकलेल्या छाप्यातून पाच कोटीचे रक्तचंदन जप्त केल्याची घटना माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार न्हावा-शेवा बंदरातून रक्तचंदनाची तस्करी करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
या प्रकरणी केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाच्या अखत्यारित असलेल्या महसूल गुप्तवार्ता संचालनालयाने, मेसर्स अलवी इम्पेक्स या कंपनीद्वारे निर्यात होणा-या मालावर धाड टाकून कार्यवाही केली आहे. या कार्यवाहीत एकूण रुपये ५,३५,६६,७३९/- किंमतीच्या वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत. त्यापैकी वाहन व बॉक्साईट वगळता रुपये ५,२४,३६,२००/- एवढ्या किंमतीच्या बंदी असलेल्या वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत. सदर प्रकरणी गुलाम मोहम्मद ओमर हा प्रमुख आरोपी असून त्यास दिनांक २४/१/२०१७ रोजी अटक करण्यात येऊन दिनांक १८/२/२०१७ पर्यंत न्यायालयीन कोठडीत ठेवण्यात आले होते. सध्या आरोपी सशर्त जामीनावर आहे. यातील दुसरा आरोपी फरहान हा फरार असून, महसूल गुप्तवार्ता संचालनालयाद्वारे तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबई शहरात सापांच्या विषाचा वापर मादक पदार्थ म्हणून होत असल्याबाबत**

**(१५) * ३०८१७ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विषारी सापांच्या तस्करीचे प्रमाण मुंबई शहरात कमी असले तरी सापांच्या विषाचा वापर बहुतांश पबमध्ये मादक पदार्थ म्हणून होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पबमध्ये स्नेक बाईटसाठी सापाच्या विषाचा वापर केला जात असून बहुतांश तस्करी ही दुतोंडी या जातीच्या सापांची होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) नाही, हे खरे नाही.

अंमली पदार्थ विरोधी कक्षाकडे अशा प्रकारची कोणतीही तक्रार सन २०१६ मध्ये नोंदविण्यात आली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील चिकणघर येथील अनधिकृत बांधकामाबाबत**

**(१६) * २८२७१ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील चिकणघर येथील आरक्षण क्रमांक १९२ ते १९७ या आरक्षित भूखंडांवर अनधिकृत बांधकाम असताना सन २०१५-१६ या कालावधीत मा.मुख्यमंत्री महोदयांच्या आदेशाने सुमारे ११ हजार चौरस मीटरचा टीडीआर मंजूर/वर्ग केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरक्षण क्रमांक १९२ ते १९७ या भूखंडावर सद्यःस्थितीत अस्तित्वात असलेले अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आरक्षण क्रमांक १९२ ते १९७ च्या मोबदल्यात हक्क विकास हस्तांतरण (टिडीआर) बेकायदेशीरपणे मंजूर करुन केलेल्या गैरव्यवहारा प्रकरणी दोषी असलेल्या चार अधिका-यांची चौकशी करण्याकरिता नेमलेल्या अधिकाऱ्यांनी चौकशी अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनस्तरावर चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार यास जबाबदार असणा-या व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने अतिक्रमण विरहित जागेचे हस्तांतरणीय विकास हक्क मंजूर केलेले आहेत. अनधिकृत बांधकामाखालील क्षेत्राचा हस्तांतरणीय विकास हक्क मंजूर केलेला नाही. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने मंजूर हस्तांतरणीय विकास हक्क इतर भूखंडावर वर्ग करावे किंवा कसे याबाबत शासनाकडून दिनांक २८/२/२०१६ च्या पत्रान्वये मार्गदर्शन अपेक्षिले असता, शासनाने हस्तांतरणीय विकास हक्क विनियोग करण्याची कार्यवाही नियमानुसार करण्यात यावी, असे महानगरपालिकेस दिनांक ४/४/२०१६ च्या पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार हस्तांतरणीय विकास हक्क वर्ग करण्याबाबतची कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात आलेली आहे.

(२) आ.क्र.१९७- माध्यमिक शाळा या आरक्षणाच्या जागेवर ४०० चौ.मी. क्षेत्राचे अतिक्रमण असून, या क्षेत्राचा हस्तांतरणीय विकास हक्क महानगरपालिकेने दिलेला नाही. या भूखंडावरील अतिक्रमण निष्कासित करण्यात आलेले नाही.

(३) नाही.

(४) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे तत्कालिन आयुक्त, श्री.रामनाथ सोनावणे, तत्कालिन नगर रचनाकार श्री.रघुविर शेळके व तत्कालिन कनिष्ठ अभियंता श्री.शशीम केदार यांची खातेनिहाय चौकशी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने सुरु केली असून, तत्कालिन सहाय्यक संचालक नगर रचना, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका श्री.चं.प्र.सिंह यांची विभागीय चौकशी सुरु करण्याचे आदेशित करण्यात आले आहे. शासनस्तरावरुन श्री.चं.प्र.सिंह यांचेवर दोषारोप पत्र बजाविण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**वाघबीळ (जि.ठाणे) गावातील अल्पवयीन मुलावर लैंगिक अत्याचार केल्याबाबत**

**(१७) * २९६१० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघबीळ (जि.ठाणे) गावातील एका अल्पवयीन मुलावर लैंगिक अत्याचार केल्याची घटना माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी मुलाच्या पालकांनी कासारवडवली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने तपास करुन दोषींवर बाल अत्याचार प्रतिबंधक कायद्याखाली गुन्हे नोंदविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय,

(२) होय,

(३) पिडीत मुलाच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपीविरुध्द कासारवडवली पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. I ३२९/२०१६ भा.दं.वि. कलम ३७७ सह बालकांचे लैंगिक अपराध पासून संरक्षण अधिनियम कलम ३, ४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आले आहे. आरोपीस अटक करण्यात आले आहे. पिडीत मुलाचा सीआरपीसी कलम १६४ प्रमाणे मा.न्यायालयात जबाब नोंदविण्यात आला आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मोहाटादेवी देवस्थान (ता.पाथर्डी, जि.अहमदनगर) विश्वस्तांनी सोन्याची 'सुवर्णयंत्रे' मुर्तीखाली पुरल्याबाबत**

**(१८) * २६७२७ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहाटादेवी देवस्थान (ता.पाथर्डी, जि.अहमदनगर) विश्वस्तांनी दोन किलो सोन्याची 'सुवर्णयंत्रे' बनवून ती मंदिराच्या बांधकामात मुर्तीखाली पुरल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू यंत्राची निव्वळ मजूरी व त्यावरील मंत्रोच्चारासाठी रूपये २५ लाखांचा खर्च केल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

सन २०१०-११ मध्ये 'सुवर्णयंत्रे' तयार करुन घेण्यात आली असून यंत्रांची संख्या ९१ व वापरले गेलेल्या सोन्याचे वजन अंदाजे १८५७.९५० ग्रॅम इतके आहे.

(२) होय, हे खरे आहे.

रुपये २४,८५,०००/- खर्च दाखविला आहे.

(३) याबाबत, मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे जनहित याचिका क्र. ४१/१४ न्यायप्रविष्ठ आहे. तसेच अहमदनगर कार्यालयाकडील निरीक्षक चौकशी क्र. ४९/१४ प्रलंबित आहे. तथापि, तद्नंतर धर्मादाय आयुक्त (प्र), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश दिनांक २७/०२/२०१७ अन्वये मा.धर्मादाय उप आयुक्त, अहमदनगर यांना चौकशीसाठी आदेशित केले आहे.

(४) मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे जनहित याचिका क्र. ४१/१४ न्यायप्रविष्ठ असल्यामुळे विश्वस्तांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे अहमदनगर कार्यालयाकडील निरीक्षक चौकशी क्र. ४९/१४ प्रलंबित आहे. तसेच मा.धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील जा.क्र.जे-१/विताप्र/०७/२०१७/अहमदनगर १०८५/२०१७, दिनांक ०१/०३/२०१७ आदेशाद्वारे मा.धर्मादाय उप आयुक्त, अहमदनगर यांना चौकशीसाठी आदेश देण्यात आले आहेत.

-----------------

**बृहन्मुंबई महानगरपालिकेत नालेसफाईच्या कामात अनियमितता झाल्याबाबत**

**(१९) * २७५३४ श्री.शरद रणपिसे : तारांकित प्रश्न क्रमांक १९८२२ ला दिनांक २० जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेत नालेसफाईच्या झालेल्या कामात सुमारे २८० कोटी रुपयांच्या गैरव्यवहाराबाबतचा राजीव कुकनूर समितीचा अहवाल माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान महानगरपालिका आयुक्तांना सादर करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त चौकशी अहवालात काय आढळून आलेले आहे, तदनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नालेसफाईच्या कामातील अनियमिततेबाबत प्राप्त अंतरिम चौकशी अहवालात खालील अनियमितता निदर्शनास आलेल्या आहेत :-

- एकच वाहन एकाच वेळी दोन ठिकाणाहून सुटणे.
- प्रत्येक रिकाम्या वाहनांचे वजन व मोजमाप कंत्राटकामाच्या सुरुवातीस न घेणे.
- प्रत्येक फेरीच्या नोंदणी व कागदपत्रे यांच्यातील तफावतीबाबत योग्यती शहानिशा करणे.
- लॉगशिट भरताना संपूर्ण तपशिल न भरणे.
- याबाबत पर्यवेक्षीय निष्काळजीपणा आढळून आलेला आहे.

सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधित १४ जणांविरुध्द खात्यांतर्गत सर्वंकष चौकशी करण्याकरीता श्री.राजीव कुकनूर, उपआयुक्त अभियांत्रिकी यांची नेमणूक करण्यात आली होती.

श्री.कुकनूर यांचा खात्यांतर्गत सर्वंकष चौकशी अहवाल प्राप्त झाला असून, यामध्ये १३ कर्मचाऱ्यांविरुध्द आरोप सिध्द झाले असून, नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

अटकेत असलेले प्रमुख अभियंता (दक्षता) यांच्यावर दोषारोपपत्र बजावण्यात आले असून, पुढील कार्यवाही महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील शाळांच्या आवारात अंमली पदार्थाची विक्री होत असल्याबाबत**

**(२०) * ३००९०  ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील शाळांच्या आवारात कॅण्डी ड्रग्ज नावाच्या नवीन अंमली पदार्थाची विक्री होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शाळेच्या आवारात कॅण्डी ड्रग्जची होत असलेली विक्री रोखणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) या संदर्भात कोणताही गुन्हा नोंदविला नसला तरी शाळांच्या आवारात अंमली पदार्थाची विक्री होवू नये म्हणून सावधानता बाळगण्यात येते त्यानुषंगाने अंमली विरोधी कक्षातर्फे महाविद्यालयीन स्तरावर जोनवारी, २०१५ पासून “ड्रग्ज फ्रि कॅम्पस” हा उपक्रम राबवून जनजागृती करण्याचे प्रयत्न चालू केले आहेत. तसेच सार्वजनिक गणेशोत्सव, नवरात्री, दहिहंडी अशा उत्सवाच्या वेळी अंमली पदार्थ कक्षाच्या वतीने जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले. तसेच वेगवेगळया एन.जी.ओ. संस्थाच्यावतीने व्यसनाधीन इसमांवर/मुलांनवर उपचार करण्यात येतात. तसेच २६ जून हा अंमली पदार्थ विरोधी दिन म्हणून पंधरवडा साजरा करण्यात येतो. यावर्षी सदर पंधरवडयादरम्यान पुढील प्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले. अंमली पदार्थ व त्याचे दुष्परिणाम याबाबत विद्यार्थ्यांना माहिती देणे, फिल्म दाखविणे, माहिती, चर्चासत्र, हॅन्डबील वाटप व भिंती पोस्टर्सचे प्रदर्शन करणे, तसेच प्रचार फे-या, मॅरेथॉन, मोहल्ला कमिटी, पब्लीक मिटींग तसेच २६ जून, २०१६ रोजी बीकेसी या ठिकाणी एन.सी.बी. च्या सहकार्याने अंमली पदार्थांचे दुष्परिणामाबाबत जनजागृती करण्यासाठी एक मिनी मॅरेथॉनचे आयोजन केले होते. याला चांगला प्रतिसाद मिळाला असून अशा प्रकारचे कार्यक्रम यापुढे ही आयोजित केलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईच्या कुर्ला (प) भागातील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत**

**(२१) * २७३४१ श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या कुर्ला (प.) भागातील सीटीएस क्र.५३० मध्ये झालेल्या बांधकामात मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बांधकाम अनियमितते प्रकरणी संबंधितांना एक महिन्याच्या आत अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याची नोटीस महानगरपालिकेने माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कालावधी उलटूनही अनधिकृत बांधकामाविरूध्द महानगरपालिकेतर्फे कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अनधिकृत बांधकाम करणाऱ्या व त्यांना संरक्षण देणाऱ्याविरूध्द काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेस तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे.

(२) सदर बांधकाम मंजूर आराखड्यानुसार पूर्ववत करण्याबाबत महानगरपालिकेमार्फत दिनांक २६/१२/२०१६ रोजी नोटीस बजावण्यात आलेली आहे.

(३) व (४) महानगरपालिकेमार्फत संबंधित विकासकाविरुध्द महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ कलम ५३(७) अन्वये स्थानिक पोलीस ठाण्यात दिनांक १०/०३/२०१७ रोजी तक्रार दाखल करण्यात आलेली आहे.

या प्रकरणी विकासकाने मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली असून, सदर याचिकेवर बांधकामास 'जैसे थे' स्थिती ठेवण्याचे आदेश दिनांक १०/०३/२०१७ रोजी पारित केलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**परभणी येथील धान्य गैरव्यवहाराबाबत**

**(२२) * २७६३७ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील कोट्यवधी रुपयांच्या धान्य गैरव्यवहारात आरोपी असलेले दोन जिल्हा पुरवठा अधिकारी, दोन तहसिलदार, दोन नायब तहसिलदार तसेच अनेक मोठे व्यापारी यांना मा.न्यायालयाने जामिन नाकारुनही त्यांना अटक करण्याऐवजी पाठीशी घालण्यात येत असल्याबाबतचा आक्षेप परभणी येथील नागरिकांनी आपले सरकार वरून गृह विभाग, मुंबई यांच्याकडे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान नोंदविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, छोटे व्यापारी व इतरांविरूध्द कारवाई करणाऱ्या पोलिसांनी अधिकारी व मोठे व्यापारी यांना पाठीशी घातल्याच्या भुमिकेची मंत्रालय स्तरावरून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, तांत्रिक अडचण दाखवून दोषी अधिकाऱ्यांना पाठीशी घालणाऱ्या सबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२), (३) व (४) या प्रकरणी अपर पोलीस अधिक्षक, परभणी यांच्यामार्फत सखोल चौकशी करण्यात आली असून सकृतदर्शनी दोषी आढळलेल्या काही शासकीय अधिकारी व व्यापारी यांच्याविरुध्द तपासादरम्यान प्राप्त पुराव्याच्या आधारे न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे. याशिवाय, उर्वरित आरोपींबाबत दोषारोपपत्र दाखल करण्यात येत आहे.

-----------------

## मौजे निमगांव (ता.मालेगांव, जि.नाशिक) येथे नवीन पोलीस ठाणे स्थापन करणेबाबत

**(२३) * २८३८४ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १८३२४ ला दिनांक १३ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाढत्या लोकसंख्येच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने निमगांव (ता.मालेगांव, जि.नाशिक) येथे स्वतंत्र पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबतचा पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडील अप्राप्त प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे काय,

(२) असल्यास, मालेगांव तालुका पोलीस ठाणे अंतर्गत येणा-या गावांची प्रचंड मोठी असलेली संख्या तालुका पोलीस ठाण्यावरील कामाचा ताण तसेच भौगोलिकदृष्टया विखुरलेला लांबवरचा परिसर संलग्न असणे, यामुळे ग्रामीण जनतेची होत असलेली मोठी गैरसोय निमगांव सारख्या मोठ्या लोकसंख्येच्या गावापासुनचे अंतर आणि कायदा व सुव्यवस्था इत्यादी बाबींचा विचार करुन मालेगांव तालुका पोलीस ठाण्याचे विभाजन करून मौजे निमगांव येथे नविन पोलीस ठाणे स्थापित करण्यात यावे अशी मागणी लोकप्रतिनिधी, नाशिक यांनी दिनांक ५ डिसेंबर, २०१६ रोजीचे पत्रान्वये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मालेगांव तालुक्यात सायने शिवारात असलेल्या तालुका पोलीस ठाण्याचे लांब अंतरावरील कार्यक्षेत्र त्यामुळे प्रसंगी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास पोलिसांना घटना स्थळी पोहचण्यास होणारा विलंब यातुन परिस्थिती चिघळण्याची शक्यता, ग्रामस्थांना खुप लांबवरुन वारंवार पोलीस ठाण्यात येतांना होणारा वेळ व पैशाचा अपव्यय इत्यादी बाबी विचारात घेता कोणता निर्णय घेण्यात आला व त्यानुसार काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) निमगांव (ता.मालेगांव, जि.नाशिक) येथे स्वतंत्र पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून शासनास प्राप्त झालेला नाही.

(२) व (३) सदर मागणीच्या अनुषंगाने माहिती सादर करण्याबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेच्या उपनगरीय रूग्णालयांसाठी डॉप्लर यंत्रे खरेदी करणेबाबत

**(२४) * ३०११७ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने उपनगरीय रूग्णालयांसाठी व प्रसूतीगृहांसाठी सोनोग्राफी, गर्भावस्था दरम्यानची सोनोग्राफी, हृदयाची व रक्तवाहिन्यांची तपासणी अशा महत्वाच्या वैद्यकीय तपासण्याकरीता अत्याधुनिक स्वरुपाची ४४ कलन डॉप्लर यंत्रे घेण्याचे प्रस्तावित केले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णांना फायदा होणा-या सदरील यंत्रांची खरेदीची निविदा प्रकिया पूर्ण करुन ही यंत्रे खरेदी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) ई-निविदा प्रक्रियेमार्फत डॉप्लर यंत्रणेच्या खरेदीची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु असून पुढील कार्यवाही जुलै, २०१७ पर्यंत पुर्ण करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर नगरपरिषदेतील गैरव्यवहाराबाबत

**(२५) * २८१६० श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर नगरपरिषदेच्या तत्कालिन मुख्याधिकारी यांच्यासह अन्य तीन मुख्याधिकारी, तहसिलदार, नगरसेवक, ठेकेदार यांची अभियंता पदी बेकायदेशीररित्या नियुक्ती करुन संगनमताने केलेल्या कोट्यवधी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करावी तसेच त्यांचे विशेष लेखापरिक्षण करुन संबंधितावर कारवाई करावी याकरिता जिल्हाधिकारी यांनी प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांचेकडे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार यात दोषी आढळून आलेल्या व्यक्तीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) पालघर नगरपरिषदेत अभियंता पदी झालेल्या नियुक्तीतील अनियमिततेबाबतची तक्रार व लेखा आक्षेप यानुषंगाने जिल्हाधिकारी, पालघर यांनी केलेल्या प्राथमिक चौकशीच्या आधारे नगरविकास विभागाने दिनांक ०९/१२/२०१६ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, पालघर यांना संबंधित मुख्याधिकारी यांचे विभागीय चौकशीसाठी दोषारोप निश्चित करण्याबाबत व उर्वरित दोषी कर्मचाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याविषयी सूचित केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) नगरपरिषदेने बांधकामे निष्कासित केल्याबाबत**

**(२६) * २७०१३ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) त्र्यंबकेश्वर (जि.नाशिक) येथील कुंभमेळाव्याच्या नावाखाली शासनाने आणि नगरपरिषदेने रस्त्यालगतची पक्की बांधकाम निष्कासित न करता वर्षानुवर्षे राहणा-या गरीब, आदिवासी, सर्वसामान्य कष्टक-यांची घरे, झोपड्या व टप-या बुलडोझरने उद्ध्वस्त केल्याबाबत शासनाच्या निषेधात दिनांक १६ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास श्रमजीवी संघटनेने मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी येथील गोरगरिबांच्या झोपड्यांवर बुलडोझर चालवून मेजर श्री.रामराव लोंढे या माजी सैनिकाच्या राहत्या घरावर बुलडोझर चालवून राहते घर व झोपड्या उद्ध्वस्त केल्याने निर्णय घेण्याबाबत समर्थन संघटनेने दिनांक २३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री, प्रधान सचिव, महसूल विभाग यांना लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार गरीब झोपडीधारकांना संरक्षण देऊन त्यांना न्याय देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) श्रमजीवी संघटनेने दिनांक १६/०१/२०१७ रोजी त्र्यंबक नगरपरिषद कार्यालयात मोर्चा काढून मागण्यांचे निवेदन सादर केलेले आहे.

(२) या आशयाचे निवेदन समर्थन संघटनेने सादर केलेले आहे.

(३) व (४) सन २०१५-१६ च्या सिंहस्थ कुंभमेळयाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या नियंत्रणाखाली महसूल व पोलीस प्रशासन तसेच त्र्यंबक नगरपरिषद यांनी संयुक्तरित्या अतिक्रमण निर्मुलन मोहीम राबविली होती.

या मोहीमेदरम्यान सुमारे ४९१ अतिक्रमणे काढण्यात आली आहेत. याच मोहीमेत श्री.रामराव लोंढे यांनी सरकारी जागेवर केलेले अतिक्रमण व त्यांच्या ताब्यातील जागेवरील अनधिकृत बांधकाम दिनांक १७/०५/२०१५ रोजी निष्कासित केले आहे.

श्री.रामभाऊ लोंढे यांची तक्रार वगळता अन्य तक्रार नगरपरिषदेस प्राप्त नाही. सदर मोहिमे दरम्यान एकही नियमित बांधकाम पाडण्यात आले नसल्याचे जिल्हाधिकारी, नाशिक यांनी कळविले आहे.

"सर्वांसाठी घरे" या संकल्पनेवर आधारीत प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत त्र्यंबक शहराची निवड करण्यात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने नगरपरिषदेकडून सर्वेक्षणाचे काम सुरु आहे.

-----------------

## शासकीय सेवेमध्ये जातीच्या आधारे पदोन्नती देण्यात आलेल्या पदांचे पुनर्विलोकन करण्याबाबत

**(२७) * ३००८४ श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासकीय सेवेमध्ये पदोन्नतील आरक्षणाचे सूत्र राबविताना संबंधित जाती-जमातीचे, सेवा ज्येष्ठता, अपुरे प्रतिनिधीत्व, मागासलेपणा एकूण कार्यक्षमता या गोष्टी राज्य शासनाने विचारात घेताना पदोन्नतीत सरसकट आरक्षण नाही असा निवाडा मा.सर्वोच्च न्यायालयाने बी.के.पवित्र आणि इतर विरुध्द भारत सरकार या खटल्या संदर्भात दिनांक ९ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केवळ जातीच्या आधारे पदोन्नती मिळालेल्या कर्मचा-यांची व अधिका-यांची मंत्रालय व विधानमंडळ सचिवालयातील वर्गनिहाय संख्या किती आहे,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) च्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार राज्य शासनाने उपरोक्त पदांवर केवळ जातीच्या आधारे पदोन्नती देण्यात आली असल्यास त्या पदांचे पुनर्विलोकन करण्यात आले आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२), (३), (४), (५) महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागासप्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम-२००१ हा राज्यात दिनांक २९/१/२००४ पासून लागू करण्यात आलेला आहे. सदर अधिनियमानुसार जातीच्या आधारे पदोन्नती देण्यात येत नसुन विशिष्ट प्रवर्गात म्हणजेच आरक्षण अधिनियम, २००१ मधील कलम ४(१) नुसार सरळसेवेमध्ये आरक्षण अधिनियम, २००१ नुसार अनुसूचित जाती (१३%), अनुसूचित जमाती (७%), विजा(अ) (३%), भज(ब)-(२.५%), भज(क)-(३.५%), भज(ड)-(२%), विमाप्र (२%) व इमाव (१९%) अशाप्रकारे ५२% आरक्षण आहे. तसेच शासन निर्णय दिनांक २५/५/२००४ नुसार पदोन्नतीमध्ये अनुसूचित जाती (१३%), अनुसूचित जमाती (७%), विजा(अ) (३%), भज(ब)-(२.५%), भज(क)-(३.५%), भज(ड)-(२%), विमाप्र (२%) अशाप्रकारे ३३% आरक्षण आहे. जात निहाय आरक्षण देण्यात येत नसुन प्रवर्ग निहाय आरक्षण देण्यात येते. अशा प्रकारे शासनाने वरील प्रमाणे प्रवर्ग निहाय आरक्षणानुसार पदोन्नत्या दिलेल्या आहेत.

आरक्षण अधिनियम २००१ संदर्भात मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.२७९७/२०१५ दाखल असून, सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयात अंतिम सुनावणी पूर्ण झाली आहे. दोन न्यायमुर्तीनी सदर प्रकरणी वेगवेगळा निर्णय दिलेला आहे. दोन न्यायमूर्तींच्या निर्णयामध्ये मतभिन्नता असल्याने, सदर प्रकरण मा.न्यायाधिश श्री.सोनक यांच्याकडे पुढील सुनावणीसाठी ठेवण्यात आले आहे. त्यामुळे सद्यःस्थितीत वरीलप्रमाणे प्रवर्ग निहाय आरक्षणानुसार पदोन्नत्या देण्यात येतात.

प्रस्तुत प्रकरण मा.उच्च न्यायालयात न्याय प्रविष्ठ आहे.

-----------------

**मुंबईसह राज्यात अंमली पदार्थाच्या विक्रीवर आळा घालण्याबाबत**

**(२८) * ३०१३० श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथे अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्या ७ नायजेरियन तरुणांना अंमली पदार्थ विरोधी विभागाच्या आझाद मैदान कक्षाच्या पथकाने रे रोड परिसरात पकडल्याची घटना दिनांक २९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्या नायजेरियन तरुणांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, मुंबईसह राज्यात अंमली पदार्थाची विक्री व तस्करी होवू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे

(२) अंमली पदार्थ विरोधी कक्ष, गुन्हे शाखा, मुंबई यांनी दिनांक २९/१/२०१७ रोजी १२ नायजेरीयन आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला असून गु.र.क्र.०३/२०१७ कलम ८ (क) सह २१(ब), २२(क) २९ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ सह कलम १४ (अ) (ब) परदेशी नागरिक कायदा दाखल करुन त्यांच्याकडून १८६ ग्रॅम एम.डी. किंमत रुपये ३,७२,०००/- व कोकेन ८५ ग्रॅम किंमत रुपये ४,२५,०००/- एकूण किंमत रुपये ७,९७,०००/- जप्त करण्यात आले आहे. सदर १२ आरोपीपैंकी ७ आरोपींना दिनांक ८/२/२०१७ पर्यंत व ५ आरोपींना दिनांक १८/२/२०१७ पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली होती. सदरचे सर्व आरोपी न्यायालयीन कोठडीत बंद आहेत.

(३) अंमली पदार्थ विरोधी कक्षातर्फे महाविद्यालयीन स्तरावर जोनवारी, २०१५ पासून “ड्रग्ज फ्रि कॅम्पस” हा उपक्रम राबवून जनजागृती करण्याचे प्रयत्न चालू केले आहेत. तसेच सार्वजनिक गणेशोत्सव, नवरात्री, दहिहंडी अशा उत्सवाच्या वेळी अंमली पदार्थ कक्षाच्यावतीने जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले. तसेच वेगवेगळया एन.जी.ओ. संस्थाच्यावतीने व्यसनाधीन इसमांवर/मुलांनवर उपचार

करण्यात येतात. तसेच २६ जून हा अंमली पदार्थ विरोधी दिन म्हणून पंधरवडा साजरा करण्यात येतो. यावर्षी सदर पंधरवडयादरम्यान पुढील प्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले. अंमली पदार्थ व त्याचे दुष्परिणाम याबाबत विद्यार्थ्यांना माहिती देणे, फिल्म दाखविणे, माहिती, चर्चासत्र, हॅन्डबील वाटप व भिंती पोस्टर्सचे प्रदर्शन करणे, तसेच प्रचार फे-या, मॅरेथॉन, मोहल्ला कमिटी, पब्लीक मिटींग तसेच २६ जून, २०१६ रोजी बीकेसी या ठिकाणी एन.सी.बी. च्या सहकार्याने अंमली पदार्थांचे दुष्परिणामाबाबत जनजागृती करण्यासाठी एक मिनी मॅरेथॉनचे आयोजन केले होते. याला चांगला प्रतिसाद मिळाला असून अशा प्रकारचे कार्यक्रम यापुढे ही आयोजित केलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सापांच्या विषाची बेकायदेशीर व अवैध तस्करीबाबत

**(२९) * ३०८१८ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भाड्याने घेतलेल्या बंद खोलीत साप, नाग व घोणस अशा घातकी सर्पांना कोंडून ठेवून सापांच्या विषाची बेकायदेशीर व अवैधरित्या तस्करी करणा-या सांगली व करमाळा येथील दोन तस्करांना खराबवाडी (ता.खेड, जि.पुणे) येथे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) चाकण पोलीस स्टेशन हद्दीत सहारा सिटी, खराबवाडी फ्लॅट नं. ए/१/१०६ येथे ४ इसमांकडे ३१ कोबरा नाग, पिंपामध्ये ९ घोणस व सात प्लॅस्टिकच्या गोणपाटात ३२ घोणस असे एकूण ७२ जिवंत विषारी साप व १ घोणस मयत स्थितीत आढळून आल्याने त्यांच्याविरुध्द चाकण पोलीस स्टेशन गु.र.नं. १२९२/२०१६ भारतीय वन्यजीव संरक्षण अधिनियम, १९७२ चे कलम ९, ४४, ४८ (क), ४९ (बी), ५१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यांतील ४ आरोपींना अटक करण्यात आली असून सध्या ते जामिनावर आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## मुंबईतील पार्किंगची समस्या सोडविण्याबाबत

**(३०) * २७६१३ श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील वाढत्या वाहनांच्या संख्येमुळे वाहतूक कोंडी बरोबरच पार्किंगची समस्याही गेल्या अनेक वर्षापासून गंभीर झालेली असून रिगल सिनेमा, क्रॉफर्ड मार्केट, क्रॉस मैदान येथे भुयारी वाहनतळाची योजना सुमारे दहा वर्षापूर्वी बृहन्मुंबई महानगरपालिकेने तयार केली होती व ४५५ कोटी रुपयाची तरतूदही केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तद्नंतर सन २००६-२००७ मध्ये बहुमजली वाहनतळ उभारण्याची योजना राबविण्याचा निर्णय बृहन्मुंबई महानगरपालिकेने घेतला होता, मात्र त्यातही प्रगती झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहरातील वाढत्या वाहनांच्या संख्येमुळे होणारी वाहतूक कोंडी व निर्माण झालेली पार्किंगची गंभीर समस्या विचारात घेता यासाठी वाहनतळ उभारण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे मुंबई शहरात रिगल सिनेमा ते हुतात्मा चौक येथील परिसरात एकूण पाच ठिकाणी भुमिगत वाहनतळ असे एक काम ज्याचा खर्च २९०.७० कोटी एवढा होता व त्यात एकूण १०२८ वाहनांसाठी पार्किंगकरीता जागा उपलब्ध होणार होत्या. तसेच क्रॉफर्ड मार्केट परिसरात एकूण दोन ठिकाणी भूमिगत वाहनतळ असे दुसरे काम ज्याचा खर्च १५४.४२ कोटी एवढा होता व त्यात एकूण ४३० वाहनांसाठी पार्किंगची जागा उपलब्ध होणार होत्या. अश्या या दोन्ही ठिकाणी भुमिगत वाहनतळ बांधायाच्या कामांसाठी २००८-०९ मध्ये निविदा मागविण्यात आल्या होत्या. या दोन्ही कामांसाठी एकूण रुपये ४४५.१२ कोटी एवढी रक्कम खर्च होणार होती.

सदर दोन्ही कामांसाठी मे. व्हेन्यू पार्किंग इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांची निवड करण्यात आली होती. तथापि, सदर कामांसाठी लागणारा खर्च मोठया प्रमाणात असल्यामुळे महानगरपालिकेने सदर दोन्ही कामे रद्दबादल करण्याचा निर्णय घेतला.

(२) सदर बाबतीत महानगरपालिकेतर्फे सल्लागाराची नेमणूक करुन सन २००८ मध्ये “स्वारस्याची अभिरुची” (RFP) मागविण्यात आल्या होत्या परंतू सदर “स्वारस्याची अभिरुची” (RFP) आर्थिकदृष्टया व्यवहार्य नसल्यामुळे ही योजना पुढे अंमलात आली नाही.

(३) व (४) सद्यःस्थितीत मुंबई शहरामध्ये १२० सशुल्क वाहनतळे असून त्याची क्षमता १४,९८० वाहनांच्या जागा इतकी आहे. सुविधा वाहनतळांतर्गत २१९८ इतक्या वाहन पार्किंग जागा उपलब्ध आहेत.

बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या विनियम ३३ (२४) चे तरतूदीनुसार जमीन मालक/विकासकाने त्यांचे जागेवर सार्वजनिक वाहनतळ बांधून बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतर केल्यास त्याचे मोबदल्यामध्ये त्यांना प्रोत्साहनात्मक चटईक्षेत्र देण्याची तरतूद आहे. सदर योजनेंतर्गत आजपर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेने एकंदर ६७ सार्वजनिक वाहनतळांना मान्यता दिलेली असून त्याची क्षमता ४४,७४८ वाहन पार्किंग जागा इतकी आहे. त्यापैकी १२ सार्वजनिक वाहनतळ पूर्ण होवून महानगरपालिकेस हस्तांतर झालेले असून त्याची क्षमता ६४३२ वाहन पार्किंग जागा इतकी आहे. इतर वाहनतळासंदर्भात कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## नालासोपारा (जि.पालघर) पश्चिम समेळपाडा येथील घन्सार जुनी चाळीच्या पुनर्विकासात विकासकाने अनियमितता केल्याबाबत

**(३१) * ३०५८३ ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समेळपाडा नालासोपारा पश्चिम (जि.पालघर) येथील जुना सर्वे नं. ५६ आणि नवीन ११ हिस्सा क्रं.६ या जागेवर घन्सार नावाची जुनी चाळ तोडून एका विकासकाने दोन पाच मजली इमारती अनधिकृतपणे बांधून तेथील रहिवाश्यांची फसवणूक केल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जुन्या रहिवाशांना बेघर केल्यामुळे या प्रकरणातील विकासकावर कारवाई करण्याबाबत स्थानिक रहिवाशांनी महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी असलेल्या विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नालासोपारा (जि.पालघर) पश्चिम समेळपाडा सर्वे नं.५६ आणि नविन ११ हिस्सा क्र. ६ या जागेवर घन्सार नावाची जुनी चाळ तोडून विकासकाने G+४ इतक्या बांधकामाची परवानगी असताना G+७ इतके बांधकाम केले असून यातील ३ मजल्याचे बांधकाम अनधिकृत आहे.

(२) उक्त तक्रार प्राप्त झाली नसल्याचे आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(३) व (४) संबधित विकासकाविरुध्द महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात येत आहे.

ज्या प्रकरणांमध्ये अनधिकृत बांधकाम झाल्याचे निदर्शनास आले आहे अशा प्रकरणामध्ये बांधकामावर वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत उक्त बांधकाम अनधिकृत असल्याचे स्पष्ट सूचना फलक लावण्यात यावे असे निर्देश वसई विरार शहर महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

तसेच अनधिकृत इमारतीतील सदनिका विक्रीस परवानगी देऊ नये अशा सूचना वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व दुय्यम निबंधक, याना देण्यात याव्यात असे निर्देश आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांना देण्यात आल्या आहेत.

-----------------

**परभणी शहरात नवीन पोलीस ठाणे निर्माण करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(३२) * २७४९९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरातील वाढती लोकसंख्या तसेच कायदा व सुव्यवस्था लक्षात घेता महानगरपालिका हद्दीत नवीन पोलीस ठाण्याच्या निर्मितीचा प्रस्ताव जिल्हा पोलीस प्रशासनाने राज्य शासनाकडे सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून नवीन पोलीस ठाण्याच्या मंजुरीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) पोलीस अधिक्षक, परभणी यांनी नवा मोंढा, परभणी ग्रामीण व ताडकळ या तीन पोलीस ठाण्यांचे विभाजन करुन नवीन एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे निर्माण करणेबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयास सादर केला होता. पोलीस महासंचालक यांनी नवीन एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे निर्माण करण्याचा सुधारीत प्रस्ताव सादर करण्याबाबत पोलीस अधिक्षक, परभणी यांना कळविले आहे. तथापि, सदर प्रस्ताव अद्याप शासनास अप्राप्त आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वसई-विरार महानगरपालिकेच्या डी.एम.पेटीट रुग्णालयातील औषधसाठा खाजगी गोदामात पडून असल्याबाबत**

**(३३) * ३०२८४ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिकेच्या डी.एम.पेटीट रुग्णालयातील विविध प्रकारचा औषधाचा साठा एका खासगी मालकीच्या गोदामात ठेवण्यात येऊन औषधे कच-यासारखी इतरत्र पसरून डम्पिंग ग्राऊंड तयार होत असल्याचे तेथील सामाजिक कार्यकर्त्यांनी माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आणले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा स्वरुपाची बातमी स्थानिक वृत्तपत्रात माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये प्रसिध्द झाली होती.

वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सर डी.एम.पेटीट रुग्णालयात औषधसाठा कक्षाचे नुतनीकरणाचे काम चालू असल्यामुळे महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारतीतील पहिल्या मजल्यावर औषधसाठा तात्पुरत्या स्वरुपात सुरक्षित हलविण्यात आलेला होता.

सदर साठा व्यवस्थित रचून ठेवण्यात आला होता.

(२) अधिष्ठाता, डी.एम.पेटीट रुग्णालय यांनी या संदर्भात त्यांचेस्तरावर चौकशी केली असून याबाबत अधिकारी/कर्मचाऱ्यांनी कर्तव्यकसूर केल्याचे आढळले नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**झरी (ता.जि.परभणी) येथील बौध्दवस्तीवर सशस्त्र हल्ला केल्याबाबत**

**(३४) * ३०३६३ श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झरी (ता.जि.परभणी) येथील बौध्दवस्तीचा विदयुत पुरवठा खंडीत करुन जातीयवाद्यांनी बौध्दांना जातीवाचक शिवीगाळ करीत सशस्त्र हल्ला करुन त्यांना बेदम मारहाण केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या मारहाणीत तीन महिला व एका तरुण असे चार जण गंभीर जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जातीयवाद्यांना अटक करण्याचे सोडून पोलिसांनीही घराघरात घुसून बौध्द तरुणांना मारहाण केली असून त्यात एक तरुण गंभीर जखमी झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या बौध्दवस्तीवर हल्ला करणा-या सोबतच बौध्द तरुणांना बेदम मारहाण करणा-या पोलिसांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) नाही.

फक्त फिर्यादी हे एकच जखमी झाले आहे.

(३) दिनांक ३०/१२/२०१६ रोजी घटना घडल्यानंतर दिनांक ३१/१२/२०१६ रोजी गावातील सवर्ण समाजाचा व्यक्ती बस स्टँड मुख्य रस्त्याने जाताना मागासवर्गीय समाजातील लोकांनी मारहाण केली. त्यावेळी गावातील दोन्ही समाजाचे लोक समोरा समोर आले. अनुचित प्रकार घडून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये याकरिता पोलिसांनी सौम्य बळाचा वापर करुन त्यांना पांगविण्यात आले. त्यामध्ये कोणीही जखमी झालेले नाही.

मागासवर्गीय समाजातील लोकांनी मारहाण केल्यामुळे जखमी झालेल्या व्यक्तीने दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस स्टेशन परभणी ग्रामीण येथे गुरनं. २७२/१६ कलम १४३, ३२३ भादंवि सह कलम १३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल आहे.

(४) दिनांक ३०/१२/२०१६ रोजी फिर्यादी व आरोपीच्या मुलासोबत दोन दिवसापूर्वी जिल्हा परिषद प्रशाला, झरी येथे भांडण झाले होते. त्या कारणावरुन गावातील १०० ते १५० मुले फिर्यादीस लोखंडी रॉडने मारहाण केली व जातीवाचक शिवीगाळ केली असे दिनांक ३१/१२/२०१६ रोजी १२.३४ वा. दिलेल्या फिर्यादीवरुन पोलीस ठाणे परभणी ग्रामीण येथे गुरनं. २७१/१६ कलम १४७, १४८, १४९, ३२४, ३२३, ४२७ भादंवि सह कलम ३(१)(आर)(एस) अ.जा.ज.अ.प्र.कायदा व १३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हयातील ९ आरोपींपैकी ८ आरोपींना अटक करण्यात आले असून, आरोपी क्र. ९ हा विधीसंघर्षग्रस्त बालक असल्याने त्यास ताब्यात घेऊन मा.न्यायालयाच्या आदेशाने त्यास पालकाच्या ताब्यात देण्यात आले आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे. पोलिसांनी फक्त बौध्द तरुणावरच सौम्य बळाचा वापर केला नसुन दोन्ही समाजातील लोकांना पांगविण्यासाठी सौम्य बळाचा वापर केला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**परेल (मुंबई) येथील शिरोडकर मंडईतील व्यावसायिकांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(३५) * ३०१३१ श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, अॅड.निरंजन डावखरे, अॅड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परेल (मुंबई) येथील शिरोडकर मंडईची इमारत धोकादायक ठरवून पाडण्यापूर्वी दुकानदारांचे पुनर्वसन न केल्याने त्यांचा व्यवसाय बंद झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मच्छिमारांच्या मंडईला महापालिकेने तळघरातील जागा देण्याची योजना तयार केल्याने या अन्यायाबाबत मंडई दुकानदार व मासळी व्यवसाय दुकानदार महिलांनी दिनांक १ मार्च, २०१७ पासून आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शिरोडकर मंडईतील दुकानदारांच्या समस्या सोडविणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) परेल, मुंबई येथील शिरोडकर मंडईच्या तळ मजल्यावरील १३२ दुकानदारांपैकी ४२ खाद्यवस्तु विक्रेत्यांना त्याच जागेवरील मंडईच्या मासळी विभागाच्या इमारतीच्या शेजारील मोकळया जागेवर व्यावसायासाठी जागा उपलब्ध करण्यात आली आहे.

उर्वरीत ९० दुकानदारांना खटाववाडी, ग्रॅटरोड येथील मंडईमध्ये तात्पुरत्या स्वरुपात पर्यायी जागा बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे देण्यात आलेली आहे.

तथापि, दुकानदार तेथे जाण्यास इच्छुक नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) विकास नियंत्रण नियमावलीनुसार सुविधा देणे आवश्यक असल्याने सर्वच दुकानदारांना तळ मजल्यावर सामावुन घेणे शक्य होत नाही.

या सर्वांना सामावून घेण्यासाठी खालील तळमजला (लोअर ग्राऊंड फ्लोअर) व वरील तळमजला (अप्पर ग्राऊंड फ्लोअर) प्रस्तावित करण्यात आलेला असून, त्याबाबतचे आराखडे मंजुरीकरीता सादर करण्यात आलेले आहेत.

या संदर्भात शिरोडकर मंडई असोसिएशन यांचे दिनांक ०४/०१/२०१७ रोजीचे बेमुदत आमरण उपोषणाचे निवेदन महानगरपालिकेस प्राप्त झाले होते, हे खरे आहे.

महानगरपालिकेमार्फत तात्पुरत्या स्वरुपात पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्यात आली असल्यामुळे या प्रकरणी चौकशी करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नायर रुग्णालयातील न्यूक्लिअर मेडिसीन विभागातील रिया गामा काऊंटर मशीन बंद असल्याबाबत

**(३६) * ३०८२८ श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गरीब रुग्णांना उपचार मिळावेत यासाठी मुंबई महानगरपालिकेकडून लाखो रुपयांची नवनवीन मशीन्स खरेदी केली जातात, मात्र या मशिन्सचा वापर रुग्णांसाठी होत नसून ती विनावापर पडून राहत असल्याची माहिती नायर रुग्णालयात माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नायर रुग्णालयातील न्यूक्लिअर मेडिसीन विभागातील रिया गामा काऊंटर ही मशीन सुमारे तीन वर्षांपासून विनावापर पडून आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील मशिन्स कार्यान्वित करून रुग्णांवर उपचार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा स्वरुपाची बातमी दिनांक ०७/०१/२०१७ रोजी पुण्यनगरी या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाली होती, हे खरे आहे.

(२) व (३) न्युक्लिअर मेडिसीन विभागात रिया गामा काऊंटर मशीन २०१३ मध्ये बसविण्यात आलेले होते. सदर मशीन एप्रिल, २०१६ पर्यंत कार्यरत होते. परंतु तांत्रिक बिघाडामुळे सदर मशीन बंद पडले आहे. तथापि, मशीन दुरुस्तीची कार्यवाही सुरु असून, मशीन माहे जुलै, २०१७ अखेरपर्यंत कार्यान्वित करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.

रुग्णांची गैरसोय होऊ नये याकरीता थायरॉईड तपासणीची सुविधा नायर रुग्णालयाच्या आंतरस्त्राव (Endocrinology) विभागात करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वसई-विरार (जि.पालघर) महानगरपालिकेतील अधिकारी व**
**कर्मचा-यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत**

**(३७) * ३०६८० ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार (जि.पालघर) महापालिकेतील ९ अधिकारी आणि कर्मचारी यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत त्यांची विभागीय चौकशी सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागीय चौकशीत निलंबित असलेले चार अधिकारी पुन्हा महानगरपालिकेच्या सेवेत रुजू झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी अधिकारी व कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नऊ कर्मचाऱ्यांची विभागीय चौकशी करण्यात आली आहे, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सर्व ९ अधिकारी/कर्मचारी निलंबित आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.